# राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

<table>
<tr><th>अ क्र</th><th>योजना</th><th>योजनेचा तपशिल</th></tr>
<tr><td>१</td><td>योजनेचे नाव</td><td>राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती</td></tr>
<tr><td>२</td><td>योजनेबद्दलचा शासन निर्णय</td><td>शासन निर्णय दिनांक 16.11.1964, दिनांक 05.02.2004</td></tr>
<tr><td>३</td><td>योजनेचे स्वरूप</td><td>राज्यातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते. सदर योजनेसाठी एकुण 1208 संच शाखानिहाय खालीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेले आहेत.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शाखा</th><th>निर्धारित संच</th></tr>
<tr><td>01</td><td>कला</td><td>285</td></tr>
<tr><td>02</td><td>वाणिज्य</td><td>230</td></tr>
<tr><td>03</td><td>विज्ञान</td><td>638</td></tr>
<tr><td>04</td><td>विधी</td><td>55</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td><td>1208</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>४</td><td>योजनेचा उद्देश</td><td>राज्यातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन देणे.</td></tr>
<tr><td>५</td><td>योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव</td><td>सर्व प्रवर्गासाठी</td></tr>
<tr><td>६</td><td>योजनेच्या प्रमुख अटी</td><td>१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. इयत्ता बारावी मध्ये किमान 60 टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.<br>३. कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी शाखेच्या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज (Fresh) करण्यास पात्र आहेत.<br>४. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>५. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यत चालू राहतील.<br>६. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.</td></tr>
<tr><td>७</td><td>आवश्यक कागदपत्रे</td><td>१. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>२. मागील वर्षाची गुणपत्रिका<br>३. बोनाफाईड सर्टिफिकेट</td></tr>
<tr><td>८</td><td>दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप</td><td>सदर योजनेसाठी प्रतिमाह 100 रु. याप्रमाणे दहा महिन्याकरिता रक्कम रु. 1000/- शिष्यवृत्ती देण्यात येते.</td></tr>
<tr><td>९</td><td>अर्ज करण्याची पध्दत</td><td>नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>१०</td><td>ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ</td><td>www.mahadbtmahait.gov.in</td></tr>
</table>